प्रत मिळाली

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** सातारा  **P.S.(ठाणे):** पाटण  **Year (वर्ष):** 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0111  **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 04/06/2019 00:33 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day**(दिवस): सोमवार  **Date From** (दिनांक पासून): 03/06/2019

**Time Period** (कालावधी): पहर 5  **Date To** ( दिनांक पर्यंत): 03/06/2019

**Time From** (वेळेपासून): 13:51 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 13:53 बजे

**(b) Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 03/06/2019  **Time** (वेळ): 23:00 बजे

**(c) General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद 001  **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 04/06/2019 00:32 बजे

**4. Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

**5. Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

**(b) Address** (पत्ता): जुनी पंचायत समिती पाटण

**(c) In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

**(a) Name** (नाव): दिपक रमेश अकुलवार

**(b) Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव)

**(c) Date/Year of Birth** (जन्म 1983  **(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

**(e) UID No.** (यु.आय.डी. क्र.):

**(f) Passport No.**(पारपत्र क्र.):  **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामापुर पाटण,पाटण,पाटण ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रामपुर रोड दत्तनगर,नांदेड,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लिना साहेबराव साळुंखे | | | 1. गजानन सोसायटी कराड,पाटण , सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 948 | 948.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 948.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

खबरी जबाब दिनांक 03/06/2019मी, दिपक रमेश आकुलवार, वय-36 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - विस्तार अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना प्रकल्प पाटण, पंचायत समिती पाटण, मुळ रा.रामपुर रोड, दत्तनगर, 2 देगलुर जि.नांदेड सध्या रा. संन्मित्र कलनी जवळ गगनगिरी मठ रामापुर पाटण जि.सातारा, मोबाईल नंबर 9423090979समक्ष हजर होवून देतो खबरी जबाब की, मी पाटण या ठिकाणी माझे कुटुंबियासह राहणेस असुन एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प पाटण पंचायत समिती पाटण या ठिकाणी विस्तार अधिकारी (सां) म्हणुन नोकरीस आहे. सन 2016 मध्ये मी नोकरी निमीत्ताने प्रवास केलेल्या प्रवासाचे प्रवासभत्ता बिल एकुण 18978/- रुपये मंजुर होणेकामी मार्च 2019 मध्ये कार्यालयात सादर केले होते. सदरचे प्रवासभत्ता बिल तयार करण्याचे काम आमचे कार्यालयातील श्री.लोकरे हे करत असतात त्यांना, वरिष्ठांचे सुचनेप्रमाणे श्रीमती साळ‌ुंखे हया मदत करत होत्या.त्यानंतर आमच्या कार्यालयातील श्रीमती एल.एस.साळुंखे पर्यवेक्षिका चाफळ 1 व 2 यांनी 15 दिवसांपुर्वी माझ्याकडे येवुन तुमचे प्रवास भत्ता बिल 18978/- रुपये होत असुन त्याचे 5% प्रमाणे 948/- रुपये तुम्हाला द्यावे लागतील, तेव्हाच तुमचे बील मंजुर होईल असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना, सध्या माझा पगार झाला नाही, पगार झाल्यानंतर बघु असे सांगितले. त्यानंतर मी अर्जित रजेवर गेलो. दिनांक 27/05/2019 रोजी मी रजेवरुन हजर झालो. त्यानंतर दुपारी श्रीमती एल.एस. साळुंखे या माझ्याकडे आल्या व त्यांनी मला आता सगळयांचे पगार झालेत तेवढे T.A. बीलाचे 5 % प्रमाणे देवुन टाका, म्हणजे तुम्हाला तुमचे T.A. बील मिळुन जाईल. असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने ठिक आहे, सध्या माझ्याकडे पैसे नाहीत उद्या तुमची भेट घेवुन माझ्या बिलाचे 5 % प्रमाणे 948/- रुपये तुम्हाला देतो असे म्हणुन मी माझे कार्यालयीन कामकाज करु लागलो. त्यानंतर पुन्हा श्रीमती साळुंखे यांनी मला, उद्या दुपारनंतर माझी भेट घ्या असे म्हणुन त्या निघुन गेल्या.त्यानंतर माझे प्रवासभत्ता बिल रक्कम 18978/- रुपयांचे बिल मिळविण्यासाठी श्रीमती साळुंखे यांनी बिलाचे रक्कमेच्या पाच टक्के प्रमाणे 948/- रुपये दिल्याशिवाय माझे प्रवासभत्ता बिल मला मिळणार नसल्याची माझी खात्री झाली असुन त्यांना मी दिनांक 28/05/2019 रोजी त्या मागणी करतील ती रक्कम नाईलाजास्तव देणार आहे. म्हणुन मी, श्री. शिर्के, पोलीस उपअधीक्षक एसीबी सातारा यांना दिनांक 27/05/2019 रोजी फोन करुन माझी वरील प्रमाणे तक्रार असल्याचे कळविले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी मला दिनांक 28/05/2019 रोजी 12.00 वा.पाटण गावचे अलीकडे पाटण ते नागठाणे जाणारे रोडवर सकस डेअरी जवळ येवुन थांबण्याची सुचना दिली.दिनांक 28/05/2019 रोजी श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी माझेशी संपर्क साधुन मला पाटण येथील सकस डेअरी जवळ येण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी, पाटण येथील सकस डेअरी जवळ माझ्याकडील दुचाकी वाहनाने आलो. त्याठिकाणी श्री. शिर्के साहेब, त्याचे सापळा पथकासह खाजगी वाहनामध्ये हजर होते. त्यावेळी श्री. शिर्के साहेबांनी, माझी व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. सातारा कार्यालयातील 1) श्री. कपिल रमेश कोपर्डे, कनिष्ठ

सहायक व 2) श्रीमती काजल अय्याज इनामदार, तंत्रज्ञ या दोन शासकिय पंचांसह व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी, माझी तक्रार शिर्के साहेब व दोन्ही पंचांना सांगुन माझा तक्रारी अर्ज शिर्के साहेबाकडे हजर केला. त्याचे दोन्ही पंचांनी वाचन करुन त्यावर सहया केल्या. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे लाच मागणी झाली अगर कसे याची पडताळणी करण्यासाठी पंच नं. 1 म्हणुन श्री. कोपर्डे व पंच नं. 2 म्हणुन श्रीमती इनामदार यांनी काम करण्याचे शिर्के साहेबांनी ठरवुन मला व पंच नं. 1 यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह मला श्रीमती साळुंखे यांची भेट घेण्यासाठी माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन पंचायत समिती पाटण कार्यालयाकडे पाठविले असता माझी व श्रीमती साळुंखे यांची भेट झाली नाही म्हणुन मी परत श्री. शिर्के साहेब व पथक थांबले ठिकाणी गेलो. त्यानंतर श्री. शिर्के साहेबांनी पुन्हा पडताळणी करण्याचे ठरवुन मला व पंच नं. 1 यांना योग्यत्या सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह पंच नं. 1 व मला, श्रीमती साळुंखे यांची भेट घेण्यासाठी माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन पंचायत समिती पाटण कार्यालयाकडे पाठविले. मी, पंच नं 1 यांचे समवेत पाटण पंचायत समिती कार्यालयात जावून श्रीमती साळुंखे यांची व माझी समक्ष भेट झाली. त्यावेळी श्रीमती साळुंखे यांनी, मी, कार्यालयीन कामकाजसाठी केलेल्या प्रवासाचे प्रवास भत्ता बिल रुपये 18,978/- या रकमेच पाच टक्के रक्कम 948/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची रेकर्ड झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं. 1 यांचे हकिकतीवरुन शिर्के साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 950/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक शिर्के साहेब यांनी एका कोऱ्या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर शिर्के साहेबांनी माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन मला व पंच नं.1 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन रवाना केले. मी व पंच नं 1 असे पाटण शहरातुन पंचायत समिती पाटण कार्यालयात गेलो. परंतु कार्यालय सुटण्याची वेळ झाल्याने श्रीमती साळुंखे या निघुन गेल्या होत्या. त्यानंतर मी कार्यालयातुन बाहेर आलो. त्यानंतर मी व पंच नं. 2 माझ्याकडील दुचाकी वाहनाने परत निघालो काही अंतर पुढे गेल्यानंतर मी माझ्या मोबाईलवरुन श्रीमती साळुंखे यांना फोन लावला त्यावेळी त्यांनी, घरी गेले असल्याचे सांगुन उद्या येण्यास सांगितले. त्यानंतर मी, सकस डेअरीचे जवळ रस्त्याचे कडेला गेलो. माझ्या पाठोपाठ सर्व पथक आले. श्री. शिर्के साहेबांनी माझेकडील व्हईस रेकर्डर काढुन बंद केला. दिनांक 28/05/2019 रोजी आयोजित केले पडताळणी कारवाईमध्ये श्रीमती साळुंखे यांनी माझ्याकडे माझे प्रवास भत्ता बिल मिळवुन देण्यासाठी बिलाचे पाच टक्के प्रमाणे 948/- रुपये लाच रक्कम मागणी करुन पंचायत समिती पाटण येथे आणुन देण्यास सांगितले. त्यानंतर आयोजित सापळा कारवाईमध्ये श्रीमती साळुंखे या कार्यालय सुटण्याची वेळ झाल्याने घरी निघुन गेल्या व त्यांना मी फोन केल्यांनतर त्यांनी दिनांक 29/05/2019 रोजी भेटायला बोलाविले असल्याने श्री. शिर्के साहेब यांनी मला दिनांक 29/05/2019 रोजी 12.00 वाजता साकस डेअरी जवळ येवुन थांबण्याच्या सुचना देवुन मला घरी जाण्यास सांगितले.त्यानंतर दिनांक 29/05/2019 रोजी मी, श्री. शिर्के साहेबांशी संपर्क साधुन श्रीमती साळुंखे या दोन तीन दिवस कार्यालयीन कामकाजासाठी सातारा जिल्हा परिषद येथे गेल्या असल्याचे सांगितले. त्यानंतर आज दिनांक 03/06/2019 रोजी श्रीमती साळुंखे या कार्यालयात येणार असल्याचे मी, श्री. शिर्के साहेब यांना कळविले. त्यावेळी श्री. शिर्के साहेब यांनी मला 12.00 वाजता पाटण येथील सकस डेअरी जवळ येवुन थांबण्याच्या सुचना दिल्या. आज दिनांक 03/06/2019 रोजी श्री. शिर्के साहेब, पोलीस उपअधीक्षक यांनी माझेशी संपर्क साधुन मला पाटण येथील सकस डेअरी जवळ येण्याच्या सुचना दिल्या त्याप्रमाणे मी, त्याठिकाणी हजर झालो. त्यावेळी श्री. शिर्के साहेब, त्याचे सापळा पथकासह खाजगी वाहनामध्ये हजर होते. त्याठिकाणी श्री. शिर्के साहेबांनी, माझी व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. सातारा कार्यालयातील 1) श्री. कपिल रमेश कोपर्डे व 2) श्रीमती काजल अय्याज इनामदार, तंत्रज्ञ या दोन शासकिय पंचांसह व सापळा पथकाची ओळख करुन दिली.त्यानंतर श्री. शिर्के साहेब यांनी माझा पुरवणी जबाब नोंदविला. त्यानंतर श्री. शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 950/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका कोऱ्या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई पथकातील कर्मचारी यांनी खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाई संबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन मला व पंच नं.1 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनारुन रवाना केले. मी व पंच नं 1 असे पाटण शहरातुन पंचायत समिती पाटण कार्यालयात गेलो.मी व पंच नं. 1 कोपर्डे असे माझ्या दुचाकीवरुन जुन्या पंचायत समिती पाटण कार्यालयाचे बाहेर गेलो. त्याठिकाणी साळुंखे मडम यांच्या जवळ गेल्यानंतर माझ्यात व साळुंखे मडम यांचेमध्ये माझ्या प्रवास भत्ता बिला बाबत चर्चा झाली. त्यावेळी साळुंखे मडम यांनी त्यांचा उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन लाच मागणीचा सुचक इशारा केला त्यावेळी मी माझ्या शर्टच्या छातीवरील डावे बाजुचे खिशात अंथ्रासिन पावडर लावुन ठेवलेली 950/- रूपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन साळुंखे मडम यांच्या समोर धरली व मोजुन बघा असे म्हणालो असता ती लाच रक्कम साळुंखे मडम यांनी उजव्या हाताने स्विकारून मोजुन बघु असे विचारुन ती लाच रक्कम दोन्ही हाताने मोजुन पाहिली. त्यानंतर मला साळुंखे मडम यांनी कार्यालयातील एका कर्मचा-यामार्फत दोन रुपये परत दिले. त्यानंतर मी, साळुंखे मडम यांना आता लवकर मिळेल ना टीए बील असे विचारले असता साळंुखे मडम यांनी हं असे म्हणुन होकारार्थी मान डोलावली. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला. तो इशारा पाहुन श्री. शिर्के साहेब व पथक माझ्या जवळ आले. श्री. शिर्के यांनी माझ्याकडुन व्हईस रेकर्डर काढुन बंद केला. व मला बाजुला थांबण्यास सांगितले. त्यानंतर श्रीमती साळुंखे व श्रीमती वावरे यांना शिर्के साहेब यांनी ताब्यात घेवुन कार्यालयातच तपासण्या केल्याचे तसेच त्यावेळी श्रीमती साळुंखे व श्रीमती वावरे यांच्या दोन्ही हाताचे बोटांचे पेऱ्यांना व तळहातास अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आल्याचे शिर्के साहेबांनी मला सांगितले. त्यानंतर माझी देखील अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळहातास तसेच शर्टचे छातीवरील खिशाचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर शिर्के साहेब यांनी श्रीमती साळुंखे व श्रीमती वावरे यांना ताब्यात घेवुन तसेच मी व पंच नं. 1 सोबतच्या वाहनांनी पाटण येथील शासकिय विश्रामगृह येथे दाखल झालो. त्यावेळी शिर्के साहेबांनी मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यस सांगितले. त्यानंतर मला त्यांचे विश्रामगृहात बोलावुन घेवुन पंचासमक्ष माझी अंगझडती घेतली. त्यानंतर शिर्के साहेबांनी, माझे व पंच नं. 1 कोपर्डे यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा विश्रामगृहाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा विश्रामगृहाचे बोलावुन घेवुन मला हकिकत विचारली.सदरबाबत सविस्तर यशस्वी पंचनामा पाटण येथील शासकिय विश्रामगृह येथे टकलिखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे. तरी श्रीमती लिना साहेबराव साळुंखे, वय 41 वर्षे, पर्यवेक्षीका, एकात्मीक बाल विकास प्रकल्प वर्ग - 3 पाटण रा. गजानन सोसायटी, साईज्योत बिल्डींग कराड मुळ रा. खालकरवाडी, पो.चरेगांव ता.कराड जि. सातारा यांनी दिनांक 28/05/2019 रोजी पडताळणी कारवाईवेळी माझ्याकडे माझे प्रवास भत्ता बिल मिळवुन देण्यासाठी झालेल्या 18978/- रुपये बिलाचे पाच टक्के प्रमाणे 948/- रुपये लाच रक्कम मागणी करुन दिनांक 03/06/2019 रोजी सापळा कारवाईमध्ये 948/- रुपयांची लाच मागणी करुन ती लाच रक्कम जुन्या पंचायत समिती पाटण इमारतीमधील एकात्मीक बाल विकास सेवा योजना प्रकल्प पाटण या कार्यालयात 13.53 वाजण्याचे सुमारास स्वत: स्विकारली आहे. म्हणून माझी त्यांचे ंविरुध्

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):** **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे Nagnath Mhadev **Rank** (पद)**:** Asst. SI (Assistant Sub-

**No.**(क्र.)**:** PCMH88926 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव)**:**

**District** (जिल्हा)**:**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**:**

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ)**:**

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम)**:** UTAM SANJAY BHAPKAR
**Rank**(पद)**:** SI (Sub-Inspector)
**No.**(सं.)**:** PAMAH84144

पोलीस स्टेशन ऑफीसर
पाटण पोलीस स्टेशन

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**:**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची | **Complexion** (रंग) | **Identification Mark(s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा/बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**